मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते बुलढाणा शहरातील संत-महापुरुषांच्या पुतळ्यांचे अनावरण >>पान 2

भंडाऱ्यातील उर्वरीत धान्य खरेदीसाठी गावकऱ्यांची चढाओढ >>पान 3

वेडी वाकडी विधाने करून अडचणीत आणू नका; अजितदादांनी शिंदे गटाच्या आमदाराचे टोचले कान >>पान 4



# दैनिक आपला विदर्भ


**सुविचार**

कधी कधी हक्क मागून मिळत नाहीत; ते मिळवावे लागतात.


apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034





प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचे आज ऑनलाईन उद्घाटन

आतील पान



■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 44 ■ शुक्रवार, दि. 20 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


## महिला सक्षमीकरणासाठी राज्य शासनाचे क्रांतिकारी पाऊल

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना निरंतर चालू राहणार

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : राज्यातील महिलाभगिनींच्या जीवनात सुखासमाधानाचे दिवस यावेत ही भावना ठेवून 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना' अंमलात आणली. महिला सक्षमीकरणासाठी राज्य शासनाने हे क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. ही योजना निरंतर चालू राहण्यासाठी शासनाने भरीव आर्थिक तरतूद केली असून यापुढेही हात आखडता घेणार नाही, अशी ग्वाही राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिली.



महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेचा वचनपूर्ती सोहळा महिलाभगिनींच्या मोठ्या उपस्थितीत बुलढाणा येथील शारदा ज्ञानपीठ शाळेच्या मैदानावर झाला. त्यात मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते विविध योजनांच्या लाभार्थ्यांचा सन्मान व विविध विकासकामांचे लोकार्पण झाले, त्यावेळी ते बोलत होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंबकल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, सहकार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दिलीप वळसे पाटील, आमदार किरण सरनाईक, वसंत खंडेलवाल, डॉ. राजेंद्र शिंगणे, डॉ. संजय कुटे, संजय रायमूलकर, ड. आकाश फुंडकर, संजय गायकवाड, श्र्वेता महाले, विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय, विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधिक्षक विश्र्व पानसरे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, महिलाभगिनींच्या सक्षमीकरणासाठी ही योजना व्यापकपणे व >>पान २

### एक कोटी भगिनींना लखपती बनविणार- उपमुख्यमंत्री फडणवीस

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आर्थिक विकासाच्या प्रवाहात महिलांना आणण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लखपती दिदीसारख्या अनेक योजना सुरू केल्या. राज्यातही १ कोटी महिलाभगिनींना लखपती बनविण्याचा आमचा निर्धार आहे. राज्यात भगिनींसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, एसटी प्रवास सवलत, मोफत शिक्षण अशा योजनांबरोबरच लाडक्या भावांसाठीही युवा कार्य प्रशिक्षण योजना, शेतक-यांना मोफत वीज, पीक विमा, सोलर वीज अशा विविध योजना सुरू केल्या आहेत. शासनाने जिगाव प्रकल्प पूर्णत्वास नेला असून, वैनगंगा- नळगंगा नदीजोड प्रकल्पामुळे बुलडाणा जिल्हा कायमचा दुष्काळमुक्त होणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

### योजनेमुळे ग्रामीण अर्थचक्राला गती - उपमुख्यमंत्री पवार

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेने महिलांना आर्थिक स्वातंत्र्य मिळवून दिले, तसेच ग्रामीण अर्थचक्राला गती दिली आहे. या रकमेमुळे महिलाभगिनींना आत्मविश्र्वास मिळाला असून, छोटे व्यवसाय करण्यास प्रोत्साहन मिळत आहे. राज्य शासनाने समाजातील सर्व घटकांसाठी अनेक योजना अंमलात आणल्या आहेत. राज्यात उद्योग- व्यवसायांचीही भरभराट होत असून, देशात सर्वाधिक परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात होत आहे. बुलडाणा शहरात उभे राहिलेले महापुरूषांचे पुतळे नवीन पिढीला सातत्याने प्रेरणा देत राहतील, असेही त्यांनी सांगितले.

# सफाई कर्मचारी हा मुंबईचा खरा हिरो - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## 'स्वच्छता ही सेवा' या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०१४ साली 'स्वच्छ भारत अभियान' सुरू करून एक चळवळ उभी केली. त्याचे फलित म्हणजे आज देशभरात हे अभियान प्रभावीपणे राबविले जात आहे. स्वच्छता हा आरोग्याचा मंत्र असून मुंबईमध्ये 'डीप क्लिन ड्राईव्ह'च्या माध्यमातून रस्ते साफ करणे, रस्ते झाडणे, पाण्याने रस्ते धुणे हे काम सुरू आहे. यामुळे मुंबईचे प्रदुषण कमी झाले असून सफाई कर्मचारी हाच खरा मुंबईचा हिरो असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले.



स्वच्छता ही सेवा-२०२४ (ड्क्ह) या राज्यस्तरीय अभियानाचा मुंबईतील गिरगाव चौपाटीवरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. याप्रसंग्री मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबई महानगर पालिका आयुक्त भूषण गगराणी, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव डॉ.के.एच.गोविंदराज, मुंबई जिल्हाधिकारी संजय यादव, मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्र्विनी भिडे, सेना दलाचे अधिकारी, राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, सफाई कर्मचारी, नागरिक आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी शुभारंभ केलेले हे राज्यस्तरीय अभियान महात्मा गांधी जयंती म्हणजे २ ऑक्टोबरपर्यंत चालणार असून राज्यातील नागरी व ग्रामीण भागात 'स्वभाव स्वच्छता – संस्कार स्वच्छता' ही संकल्पना राबविण्यात येणार आहे. या स्वच्छता पंधरवडा मोहिमेकरिता सर्वांची भागीदारी असायला हवी, असे आवाहन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले. मुख्यमंत्री म्हणाले की, स्वच्छता ही सेवा अभियानाच्या उपक्रमाद्वारे आर.आर.आर. (रिड्युस, रियुज, रिसायकल) केंद्र उभारून पर्यटन स्थळावर शुन्य कचरा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांअंतर्गत वृक्षारोपण आणि सौंदर्यीकरण करण्याचे काम सुरू आहे. नियमित स्वच्छ न होणारी ठिकाणे शोधण्यात आली असून अशी ठिकाणे कायमस्वरूपी स्वच्छ राहील, याकरिता त्रिसुत्री नियोजन करण्यात आले आहे. यासाठी सर्वांचा सहभाग आवश्यक आहे.


मुख्यमंत्री म्हणाले की, स्वच्छ भारत अभियानात महाराष्ट्र कुठेही कमी पडणार नाही. स्वच्छ भारत अभियानात देशात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. या स्वच्छ भारत >>पान २

## जरांगे यांचा उपचार घेण्यास नकार, प्रकृती काळजी करण्यासारखी; जिल्हा आरोग्य अधिकारी भुसारे यांची माहिती



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी** : मनोज जरांगे पाचील यांच्या आमरण उपोषणाचा आज तिसरा दिवस आहे. आज जिल्हा आरोग्य अधिकारी जयश्री भुसारे यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. जयश्री भुसारे यांच्या पथकाने जरांगे याची तपासणी केली, त्यानंतर त्यांच्याकडे उपचार घेण्याचा आग्रह धरला मात्र जरांगे पाटील यांनी उपचार घेण्यास नकार दिला आहे. सकाळी करण्यात आलेल्या तपासणी नुसार जरांगे पाटील यांची शुगर लेव्हल कमी झाली आहे, अशक्तपणा आला आहे, बीपी थोडासा लो झाला आहे त्यांची प्रकृती चिंताजनक आहे, तसेच परत एकदा उपचार घेण्यासाठी त्यांना आग्रह करणार आहे अशी माहिती यावेळी जालना जिल्हा आरोग्य अधिकारी जयश्री भुसारे यांनी दिली आहे.




# सहसचिव सिद्धार्थ खरात यांच्या कार्याला मातोश्रीवरून बळ

## उच्चशिक्षीत उमेदवारांमुळे मतदारात आनंदाचे वातावरण

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : उच्चविद्याविभूषीत मंत्रालयीन सहसचिव पदावर कार्य करीत असताना गोरगरिबांचे कामे व्हावीत या ध्यास उराशी घेत सिद्धार्थ खरात यांनी मोठ्या पदाची नोकरी सोडून समाजकार्यात स्वत:ला झोकून दिले होते. त्यांच्या याच कार्याची दखल घेत व समाजाप्रती असलेली तळमळीला उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने बळ दिले आहे. तर खरात यांच्या सामाजिक कार्यामुळे मतदारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. एक उच्चविद्याविभूषीत उमेदवार म्हणून खरात यांच्याकडे मतदारवर्ग पाहू लागला आहे.



सिद्धार्थ खरात यांनी एक जुलैला स्वच्छ निवृत्ती घेतल्यानंतर त्यांनी स्वत:ला सामाजिक कार्यामध्ये झोकून दिले. निस्वार्थपण समाजसेवेचे व्रत घेतलेल्या सिद्धार्थ खरात यांच्या या सामाजिक कार्याची दखल मातोश्रीवर घेण्यात आली आहे. मेहकर विधानसभा मतदारसंघात सिद्धार्थ खरात यांच्यासारखा सामाजिक तळमळीचा उमेदवार मिळावा, अशी अपेक्षा मतदारांकडून व्यक्त केली जात आहे. मेहकर विधानसभा मतदारसंघ त्यांच्या नावाला प्रथम पसंती मिळत असल्याचे दिसून येत आहे. मंत्रालयीन सहसचिवपदावर तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रामविकास, गृह विभाग या विभागांमध्ये काम केल्याचा दांडगा अनुभव आहे. तसेच त्यांनी राज्यमंत्री कॅबिनेट मंत्री व केंद्रीय राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव म्हणूनही त्यांनी काम केले आहे. कामाचा मोठा अनुभव असल्याने भविष्यात मतदार संघातील समस्या मार्गी लावण्यास याचा फायदा होणार आहे. सामाजिक कार्याला आता मातोश्रीवरून बळ मिळत असल्याने मतदार संघातील सर्वसामान्य नागरिकांसह कार्यकर्त्यांमध्ये कमालीचे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मतदार संघातील बॅकलॉग भरून काढण्यासाठी अशा उच्चविद्याविभूषीत उमेदवारांची आवश्यकता असल्याचे मतदार संघातील सर्वसामान्य नागरिकांकडून बोलले जात आहे. तसेच सिद्धार्थ खरात यांना मिळत असलेली लोकप्रियता पाहता विरोधकांमध्येही धास्तीचे वातावरण निर्माण झाले आहे. विधानसभा निवडणुकीचा कालावधी जसजसा जवळ येत आहे. तसतसा सिद्धार्थ खरात यांना मेहकर मतदार संघातील मतदारांकडून प्रथम पसंती मिळत असल्याचे दिसून येत आहे. अनेक वर्षांपासून मतदार संघातील अनेक समस्या निकाली न निघाल्याने समाजकार्याची जान असलेला आमदार यावेळेस व्हावा, अशी मतदारांची इच्छा असताना सिद्धार्थ खरात यांच्यारूपाने एक सामाजिक तळमळीचे नाव समोर आले आहे. सिद्धार्थ खरात यांना आतापासूनच मेहकर मतदार संघातील सर्वच मतदारांकडून पसंती मिळत असून मातोश्रीवरून सुद्धा या समाजकार्याला हातभार लावून या समाजकार्यात वाढ केली आहे. मतदारांचा आतापर्यंत मिळत आलेला प्रतिसाद तसेच या प्रतिसादात दिवसागणिक होत असलेली वाढ उच्चशिक्षित तथा मंत्रालयीन सहसचिव या पदाबरोबर सामाजिक कार्याने सिद्धार्थ खरात यांनी सर्वसामान्यांचे मन जिंकून घेतले आहे. तर सिद्धार्थ खरात यांचा वाढता प्रतिसाद पाहता विरोधकही धास्तावले असल्याची चर्चा मेहकर मतदार संघात होताना दिसून येत आहे.



# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते बुलढाणा शहरातील संत-महापुरुषांच्या पुतळ्यांचे अनावरण

## संत आणि महापुरुषांची स्मारके प्रेरणा व उर्जा देणारे ठरतील






**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा नगर परिषदेमार्फत बुलढाणा शहरातील विविध भागात संत आणि महापूरुषांचे पुतळे स्थापीत करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज या पुतळ्यांचे अनावरण करण्यात आले.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते बुलढाणा शहरातील मलकापूर रोडवरील शिवारत्न शिवा काशिद, संत गाडगे बाबा तर जयस्तंभ चौकातील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज, राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व माता रमाबाई, महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले, संगम चौकातील छत्रपती शिवाजी महाराज आणि संत रविदास महाराज, शासकीय विश्रामगृह जवळील वसंतराव नाईक, राजर्षी शाहू महाराज, महात्मा बसवेश्र्वर महाराज, तहसील चौकातील नरवीर तानाजी मालुसरे आणि एडेड हायस्कूल चौकातील नरवीर बाजीप्रभू देशपांडे, कारंजा चौकातील अग्रसेन महाराज यांच्या पुतळ्याचे, जैन समाजाच्या स्मारकाचे तसेच भगवान वीर एकलव्य महाराज, महर्षी वाल्मिकी ऋषी, शहिद जवान युध्द स्मारकाचे अनावरण करण्यात आले.

यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, बुलढाणा शहरात उभारण्यात आलेल्या सर्व संत-महापुरुषांची स्मारके ही आपल्या सर्वांना आजही प्रेरणा व उर्जा देणारे ठरतील. या संत-महापुरुषांचे पुतळे हे भावी पिढीला समतेचा आणि मानवतावादी विचारांचा संदेश देतील.

यावेळी अनावरण कार्यक्रमास केंद्रीय आयुष, व आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आमदार सर्वश्री संजय गायकवाड, संजय रायमुलकर,



डॉ. राजेंद्र शिंगणे, श्रीमती श्वेता महाले, बुलढाणा नगर परिषदेचे मुख्याधिकारी गणेश पांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## अमेरिकेतील गन संस्कृती

अमेरिकेत सध्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीची धामधूम सुरू आहे. दोन महिन्यांनी म्हणजे नोव्हेंबर महिन्यात अमेरिकेत राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक होणार असून या निवडणुकीत अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि ज्यो बायडेन यांच्या सरकारमध्ये उपराष्ट्राध्यक्ष राहिलेल्या मूळ भारतीय वंशाच्या कमला हॅरिस हे प्रतिस्पर्धी आहेत. दोघेही आपला प्रचार जोरदारपणे करीत आहे. दोघेही एकमेकांच्या तोडीस तोड असल्याने ही निवडणूक रंगतदार होणार आहे. दोघेही आपल्याला निवडून द्या अशी मागणी जनतेकडे करीत आहेत. निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहचला आहे. निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहचला असतानाच डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर दुसऱ्यांदा गोळीबार झाल्याची बातमी आली आणि जगभर खळबळ माजली. दोन महिन्यात डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर झालेला हा दुसरा जीवघेणा हल्ला आहे. सुदैवाने दोन्ही वेळा त्यातून ते बचावले. १३ जुलै रोजी अमेरिकेतील पेनिसिल्व्हिया राज्यातील एका प्रचार सभेत त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला. त्यावेळी ट्रम्प यांच्यावर चालवण्यात आलेली गोळी त्यांच्या कानाला चाटून गेली होती. हा हल्ला सभेपासून जवळ असलेल्या छतावरून करण्यात आला. एका वीस वर्षीय तरुणाने त्यांच्यावर हल्ला केला होता. तो हल्ला ताजाच असताना त्यांच्यावर नुकताच असाच एक जीवघेणा हल्ला करण्यात आला. हा हल्ला डोनाल्ड ट्रम्प हे वेस्ट पाम बीच येथील गोल्फ कोर्स वर गोल्फ खेळत असताना त्यांच्यावर करण्यात आला. झुडुपात लपून बसलेल्या रायन रूथ या तरुणाने त्याच्या ए के ४७ या रायफल मधून त्यांच्यावर गोळीबार केला. दैव बलवत्तर म्हणून त्यांचा यावेळीही त्यांचा जीव वाचला. माजी राष्ट्राध्यक्ष राहिलेल्या आणि राष्ट्राध्यक्षपदाच्या शर्यतीत असलेल्या इतक्या मोठ्या जागतिक नेत्यांवर जीवघेणा हल्ला होणे हे अमेरिकेच्या गन संस्कृतीचे लक्षण आहे. जगासाठी जरी ही खळबळजनक घटना असली तरी अमेरिकेसाठी हे काही नवे नाही कारण याआधीही अमेरिकेच्या काही माजी राष्ट्राध्यक्षांवर असा जीवघेणा हल्ला झाला आहे. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन, जेम्स गारफील्ड, विल्यम मॅककिनले आणि जॉन एफ केनेडी यांची हत्या झाली आहे. केवळ राजकीय नेतेच नाही तर जनता देखील या गन संस्कृतीला कायम बळी पडत आली आहे. गन संस्कुती मुळे अमेरिकेत लाखो नागरिक मरण पावले आहेत. अमेरिकेत गोळीबाराच्या घटनेत मरण पावलेल्या नागरिकांची संख्या ऐकली तर आपल्याला धस्स होईल कारण अमेरिकेत गोळीबाराच्या घटनांमध्ये मागील पन्नास वर्षात १४ लाख लोकांना जीव गमवावा लागला आहे. अमेरिकेत गोळीबाराच्या घटनेत दररोज सरासरी १०० लोक मरण पावतात. ही आकडेवारी थक्क करणारी आहे. कारण जागतिक महासत्ता असलेल्या देशात अशा प्रकारे लोकांचा जीव जात असेल तर ते धक्कादायकच नाही तर चिंताजनक देखील आहे. अमेरिकेत शाळेत गोळीबार झाल्याचा आणि त्यात अनेक शाळकरी मुलांचा मृत्यू झाल्याच्या बातम्या आपण नेहमीच ऐकतो, वाचतो अर्थात याला अमेरिकाच जबाबदार आहे. अमेरिकेत पूर्वीपासून गन संस्कृती अस्तित्वात आहे. दुकानातून फळे, भाजीपाला मिळतात तशा तिथे बंदुका विकत मिळतात. बंदुका चालवण्यासाठी किंवा विकत घेण्यासाठी आपल्याकडे जसा शासकीय परवाना काढावा लागतो तसा तिथे काढावा लागत नाही. तिथे बंदुका आणि काडतूस सहज मिळतात म्हणूनच तिथे गन संस्कृती उदयास आली. आता हीच गन संस्कुती अमेरिकेच्या मुळाशी आली आहे. अमेरिकेच्या या गन संस्कृतीवर अनेकांनी चिंता देखील व्यक्त केली आहे पण अमेरिकेच्या नेत्यांनी ती कधीही गांभीर्याने घेतली नाही. खुद्द डोनाल्ड ट्रम्प हे गन संस्कृतीचे मोठे समर्थक आहेत. २०१६ मध्ये त्यांनी दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी रिव्हॉल्वर व रायफल हे स्वसंरक्षणासाठी एक उत्तम शस्त्र असल्याचे म्हंटले होते. केवळ ट्रम्पच नाही तर अमेरिकेतील अनेक नेते हे गन संस्कृतीचे समर्थक आहेत. आता मात्र हीच संस्कुती त्यांच्या जीवावर उठली आहे.

# दिग्रस येथे ईदे-मिलादनिमित्त १११ सर्वधर्मीय बांधवांनी रक्तदान जरून घडविले राष्ट्रीय ऐक्याचे दर्शन !

## डॉ एपीजे अब्दुल कलाम फोरमचा पुढाकार




**दैनिक आपला विदर्भ**

**दिग्रस/प्रतिनिधी :** दिग्रस येथे ईद-ए-मिलादनिमित्त तब्बल १११ हिंदू-मुस्लिमांनी स्वेच्छेने रक्तदान करून अंतिम प्रेषित मुहम्मद सल्लम यांना अपेक्षित व अभिप्रेत, अशी अभिनव व खरी आदरांजली वाहिली. डॉ एपीजे अब्दुल कलाम फोरमतर्फे सदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रीय ऐक्याचे दर्शन घडले.

दिग्रस येथे सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमासाठी अग्रेसर असलेल्या डॉ एपीजेअब्दुल कलाम फोरमच्या वतीने स्थानिक ग्रामीण रुग्णालयात सदर चौथ्या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . यात मुस्लिमांसह इतर धर्मीय-बांधवांनी स्वेच्छेने रक्तदान करून राष्ट्रीय ऐक्याचे कृतिपूर्ण दर्शन घडविले. मुस्लिमांसह आशिष अगलदरे, तुषार राठोड, गौरव दुधे, अखिलेश राठोड, पंकज घुगे यांनी देखील स्वेच्छेने रक्तदान केले. सर्व १११ रक्तदात्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सुधीर देशमुख, गायत्री फाउंडेशनचे डॉ उत्तम राठोड, माजी उपनगराध्यक्ष अजिंक्य मात्रे, माजी नगरसेवक केतन रत्नपारखी, शिंदे शिवसेना शहर प्रमुख डॉ संदीप दुधे, बालरोगतज्ज्ञ डॉ अर्जुन जाधव, नायब तहसीलदार संदीप सोनकुसरे, रमाकांत सप्रे, गोपाल शहा, शेतकरी मित्र संतोष चव्हाण, निवृत्त केंद्र प्रमुख, किरण बारशे, संजय ढोले, अजय अमराह, पंकज देशमुख आदी मान्यवरांनी रक्तदान शिबिराला सदिच्छा भेट देऊन आयोजक व रक्तदात्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

यवतमाळ येथील श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रक्तपेढी विभागाचे रक्तसंक्रमण अधिकारी डॉ नयन गेडाम, समाजसेवा अधीक्षक आशिष दहापुते, अधिपरिचारक विजय कुर्हे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ राजडोहळे, अनिकेत राठोड, अंजली जाधव, नंदकिशोर शंभरकर, विकास जाधवसह डॉ एपीजेअब्दुल कलाम फोरमच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

पान १ वरून...

## महिला सक्षमीकरणासाठी

गतीने राबविण्यात आली. विक्रमी कमी वेळेत पैसे खात्यात येणारी ही योजना ठरली आहे. शासनाने ३३ हजार कोटी रुपये या योजनेसाठी बाजूला काढून ठेवले आहेत. त्यामुळे योजना कधीही बंद पडणार नाही. योजनेत मिळणा-या रकमेमुळे गरीबांना निश्र्चित मदत होत आहे. यापुढेही बळ मिळाले तर आम्ही ही रक्कम वाढवत जाऊ, अशी ग्वाही त्यांनी दिली. ते पुढे म्हणाले की, मुलींना मोफत शिक्षण, लेक लाडकी, लखपती दीदी, अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, किसान सन्मान योजना, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना अशा योजनांमुळे महिलांना व कुटुंबांना बळ मिळत आहे. महिला बचत गटांच्या माध्यमातून विविध व्यवसायांचे जाळे निर्माण होत आहे. अधिकाधिक बहिणींना लखपती झाल्याचे बघायचे आहे. या योजनेमुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे.बुलढाणा शहरात निर्माण करण्यात आलेले महापुरूषांचे पुतळे व विविध कामे सौंदर्यीकरण व विकासाला चालना देणारी आहेत. महापुरूषांच्या स्मारकामुळे नव्या पिढीला कायम स्फूर्ती मिळत राहील, असेही त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत लाभार्थ्यांना धनादेश वाटप, तसेच लखपती दिदी योजनेच्या लाभार्थ्यांचा सन्मान यावेळी करण्यात आला. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा योजना लाभार्थ्यांना लाभाचे वितरण करण्यात आले. बुलढाणा जिल्हा प्रशासनातर्फे प्रकाशित जिल्हा कॉफीटेबल बुक आणि 'राजमाता' बोधचिन्हाचे अनावरण यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. प्रारंभी मुख्यमंत्री श्री. शिंदे व मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे, तसेच राजमाता जिजाऊ, पुण्यश्र्लोक अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले आणि रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. आमदार संजय गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. महिलाभगिनींचा प्रचंड उत्साह आणि दाद समारंभात जिल्ह्याच्या कानाकोप-यातून लक्षावधी भगिनी उपस्थित होत्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कार्यक्रमस्थळी आगमन झाल्यावर महिलाभगिनींनी टाळ्यांच्या कडकडाटात व मोबाईल टॉर्च उंचावून त्यांचे जोरदार स्वागत केले. लाडक्या बहिणींचे अभिवादन स्वीकारत मान्यवरांनी मंचावर प्रवेश केला. यावेळी अनेक भगिनींनी मान्यवरांना राख्या बांधल्या व त्यांच्यासमवेत सेल्फीही घेतली. मान्यवरांनीही सर्वांचे अभिवादन स्वीकारत त्यांच्याशी संवाद साधला.

## सफाई कर्मचारी हा

अभियानांतर्गत मुंबई महानगरपालिकेने दीड लाख झाडे पावसाळ्यात लावली आहे. या अभियानामध्ये ९,३५९ कार्यक्रमाची नोंदणी झाली असून सीटीयू (क्लिनलीनेस टार्गेट युनिट) अंतर्गत ४,५२० ठिकाणे शोधली असून या ठिकाणचा कचरा उचलला जाणार आहे. याकरिता जनसहभागाचे ४,१११ कार्यक्रम राबविले जाणार आहे.

## कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मिळणार पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते नुकसान भरपाई

# राज्यात सोयाबीन खरेदी केंद्र तातडीने सुरु करावीत- कृषीमंत्री धनंजय मुंडे

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान वाटप करण्याचा कार्यक्रम प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लवकरच होणार आहे. त्यामुळे या कामातील केवायसी व इतर तांत्रिक अडचणी दूर करण्याचे, तसेच केंद्र शासनाने दिलेल्या सूचनांनुसार राज्यात सोयाबीन खरेदी केंद्रे तातडीने सुरु करण्यात यावीत, असे निर्देश कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिले.



मंत्रालयात आयोजित आढावा व नियोजन बैठकीत मुंडे बोलत होते. या बैठकीस कृषी विभागाच्या सचिव जयश्री भोज, कृषी संचालक विजयकुमार आवटे यांच्यासह कृषी विभागातील अधिकारी उपस्थित होते.

सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रती हेक्टर ५ हजार रुपये (२ हेक्टरच्या मर्यादित) अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयामुळे ९१ लाख हेक्टर वरील ८३ लाख शेतकऱ्यांना ४१९४ कोटी अनुदान वितरित करण्यात येणार आहे.

**३६ लाख शेतकऱ्यांची केवायसी पूर्ण**

राज्यात कापूस व सोयाबीन खातेदारांची एकूण संख्या ९६.१७ लाख आहे. त्यापैकी ७५.३१ लाख शेतकऱ्यांची क्षेत्रीय स्तरावर संमती पत्रे प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ६४.८७ लाख खातेदार शेतकऱ्यांचा डाटा पोर्टलवर भरण्यात आलेला आहे. त्यापैकी नमो शेतकरी सन्मान योजनेच्या डाटा सोबत ४६.८ लाख शेतकऱ्यांचा डाटा जुळला आहे. तर ई पीक पाहणी नावांच्या डेटा पैकी ३६ लाख नावे जुळलेली आहेत. त्यामुळे १० लाख शेतकऱ्यांची नावे प्रत्यक्ष पडताळणी करून जुळवावी लागणार आहेत. हे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यक्रमापूर्वी पूर्ण करण्याचे आदेश कृषीमंत्री श्री. मुंडे यांनी यावेळी दिले.

**सोयाबीन खरेदी केंद्रे तातडीने सुरु करावीत - मुंडे**

केंद्र शासनाने सोयाबीन खरेदीसाठी हमीभाव घोषित केले आहेत. यावर्षी सोयाबीनचे ७३.२७ लाख मेट्रिक टन इतके बंपर उत्पन्न अपेक्षित आहे. त्यामुळे राज्य शासनाने किमान हवी भावाने सोयाबीन खरेदीचा प्रस्ताव केंद्राला सादर केला होता. त्याला केंद्र शासनाने मान्यता दिली असून नाफेड व एनसीसीएफ मार्फत सोयाबीन खरेदीची केंद्रे उभारण्याचे काम गतीने पूर्ण करावेत. राज्य शासन सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होऊ देणार नाही, असे कृषीमंत्री श्री. मुंडे यांनी सांगितले.

# रिसोड येथील भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** रिसोड येथे भव्य आरोग्य तपासणी, निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

येथील उत्तमचंद बगडिया कला व वाणिज्य महाविद्यालय येथे शुक्रवार, शनिवार व रविवार दिनांक २०,२१ व २२ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते ४ या दरम्यान ममता व मधुसूदन अग्रवाल फाउंडेशन मुंबई अंतर्गत संजीवनी ममता हॉस्पिटल व रिसर्च सेंटर, मुंबई यांनी या शिबिराचे आयोजन केले असून या शिबिरामध्ये प्रामुख्याने सर्व प्रकारचे कर्करोग म्हणजेच कॅन्सर, गुडघ्यांचे व खुब्याचे प्रत्यारोपण म्हणजेच नी व हीप जॉईंट रिप्लेसमेंट, मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्या जातील.

सर्व प्रकारचे कॅन्सर मध्ये जसे की, स्त्रियांच्या स्तनाचा कर्करोग म्हणजेच ब्रेस्ट कॅन्सर, यांची मॅमोग्राफी व्हॅन मधील स्क्रीनिंग मशीनद्वारे परीक्षण करण्यात येईल. स्त्रियांच्या गर्भाशयाचा कर्करोग म्हणजेच सर्वाइकल कॅन्सर मध्ये स्त्रियांच्या स्त्रावाचे pap smear द्वारे परीक्षण करण्यात येईल. मुख कर्करोग म्हणजेच तोंडाचा कॅन्सर रुग्णाचे अत्याधुनिक डेंटल व्हॅन मध्ये स्क्रीनिंग द्वारे परीक्षण करण्यात येईल. फुफ्फुसाचा कर्करोग म्हणजे लंग कॅन्सर,घशाचा कॅन्सर, अन्ननलिकेचा कॅन्सर, शरीरावर नवीन गाठ येणे,गुदद्वाराचा कॅन्सर व इतर सर्व प्रकारचे कॅन्सर आजारांचे निदान व उपचार करण्यात येतील. साधारणतः पुढील लक्षणे असल्यास कृपया रुग्णांनी आपली तपासणी करून घेणे आवश्यक आहे या मध्ये खूप जास्त घाम येणे, रात्रीला खूप जास्त ताप येणे,दीर्घकाळ वारंवार चक्कर येणे. दीर्घकाळ अशक्तपणा,वजनात अचानक घट होणे या लक्षणांचा समावेश आहे.गुडघ्याचे व खुब्याचे आजार म्हणजेच नी व हिप जॉईंट गुडघ्याचे व खोब्याचे जॉईंट्सच्या आजारांचे तज्ज्ञांद्वारे निशुल्क निदान व मुंबई येथे निशुल्क ऊपचार म्हणजेच प्रत्यारोपण करण्यात येईल.

गुडघ्यांमध्ये अथवा खुब्यामध्ये किंवा आसपासच्या भागात लक्षणीय वेदना असल्यास, कडकपणा असल्यास, सूज येत असल्यास व हालचाल होत नसल्यास,एका पायावर उभे राहण्यास अडचण येत असल्यास, चालताना लंगडेपणा जाणवत असल्यास. नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

शिबिरामध्ये निदान झालेल्या रुग्णांचे उपचार संजीवनी ममता आणि मधुसूदन अग्रवाल हॉस्पिटल व रिसर्च सेंटर मुंबई येथील प्रसिद्ध तज्ञ डॉक्टरांद्वारे करण्यात येणार आहेत.



ममता व मधुसूदन अग्रवाल फाउंडेशन अंतर्गत संजीवनी ममता हॉस्पिटल व रिसर्च सेंटर तर्फे रिसोड शहरामध्ये आतापर्यन्त मेगा तीन आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या मध्ये विविध आजारावर तील ४८६५ रुग्णांची तपासणी करून विविध आजाराच्या १८९० रुग्णांवर यशस्वी उपचार करण्यात आलेले आहेत. श्री पुरुषोत्तमजी अग्रवाल,श्री मधूसुधनजी अग्रवाल व श्री मन्नालालजी अग्रवाल हे बंधु स्थानिक रिसोड चे असून आपल्या मातृभूमीचे ऋण म्हणून ते रिसोडकरांची वेगवेगळ्या माध्यमातून सेवा करीत असतात. सामाजिक धार्मिक, आरोग्य व शिक्षण क्षेत्रामध्ये या तिन्ही बंधूंचे मोठे योगदान असून कोविड काळात संपूर्ण रिसोड तालुक्यातील नागरिकांचे निशुल्क लसीकरण करून नागरिकांना जीवदान दिल्याने रिसोडकर यांच्याकडे संकटमोचंक म्हणूनच बघतात. पुरुषोत्तमजी अग्रवाल यांचे हे अमृतमहोत्सवी वर्ष साजरे होत असून या अमृतमहोत्सवी वर्षात आरोग्य शिबिरासह १४ डिसेंबर रोजीबगडिया कॉम्प्लेक्स,गुजरी चौक रिसोड येथे समता सर्वस्व आरोग्य सेवा डायग्नोस्टिक सेंटर सुरु करणार असून ग्रामीण भागातील गरजू जनतेसाठी टेलीमेडिसिन सेवा उपलब्ध असणार आहे.यामध्ये विविध रोगाच्या तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### कोणताही अनुचित प्रकार घडल्यास नागरिकांनी पोलिसांना संपर्क करावा; पोलीस उपायुक्तांचे आवाहन



दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी** : भिवंडीत शहरात पोलीस उपायुक्त मोहन दहीकर यांनी पहिल्याच दिवशी पदभार स्वीकारला असून गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीत घडलेल्या अप्रिय घटने नंतर शहरात सतत दोन दिवस तणावपूर्ण शांतता राहिली आहे.या घटनेचे पडसाद समाजात उमटत असताना कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी भिवंडीत ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नागरिकांनी पोलिसांना संपर्क करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले आहे.

### उत्कृष्ट कामगार पुरस्काराने गुणवंत मिसलवाड सन्मानीत

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** :महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार या आस्थापनेत यांत्रिकी विभागात कार्यरत असलेले दैनंदिन वाहन देखभाल (मेन्टनन्स मेकॅनिक) तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा.श्री. गुणवंत एच. मिसलवाड यांना एसटी डेपो नांदेड आगाराच्यावतीने सन २०२४ या वर्षात उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबद्दल रा.प.म. नांदेड आगाराच्यावतीने उत्कृष्ट कामगार म्हणून मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या भव्य अशा कार्यक्रमामध्ये आगार व्यवस्थापक मा.श्री. अनिकेत बल्लाळ यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले. यावेळी सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक मा.श्री. विष्णू हारकळ, श्रीनिवास रेणके, वाहतुक निरीक्षक शेख मोबीन, सुधाकरराव घुमे, आगार लेखाकार सतीश गुंजकर व इतर मान्यवर उपस्थित होते.मा.श्री. गुणवंत एच. मिसलवाड यांना यापूर्वी गुणवंत कामगार म्हणून राज्यपाल पुरस्कार, अशोक लिलँड कंपनी प्रा. लि. कंपनीच्यावतीने हाई मायलेज अॅवार्ड तसेच सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल जीवन गौरव पुरस्कार असे अनेक सामाजिक पुरस्कारही त्यांना मिळालेले आहेत. ते प्रवाशी सेवेबरोबरच सामाजिक क्षेत्रातही त्यांचा सक्रीय सहभाग असतो.

# अमेरिका स्थित शिवप्रेमीं परिवाराचे लॉस एंजलिस येथील प्रतिनिधी विजय पाटील यांची नीलम गोर्हे व ना.दिपक केसरकर यांची भेट

दैनिक आपला विदर्भ

■ उदय नरे

**मुंबइ** : छत्रपती शिवाजी महाराज हे विश्र्वातील एक महान विचारवंत आणि प्रेरणादायक नेतृत्व होते. जगभरात विशेषत: अमेरिका सारख्या मोठ्या देशात महाराष्ट्राचे सण व संस्कृती टिकविण्यासाठी प्रयत्न होत आहे हे नक्कीच कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन याप्रसंगी उपसभापती व शिवसेना नेत्या डाँ नीलमताई गोऱ्हे यांनी केले.

अमेरिकेत स्थायिक झालेले श्री. विजय पाटील हे श्री छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रिय परिवार हे व्यासपीठ तयार केले आहे.या व्यासपीठाने जग भरातील १९० देशात व २५० शहरांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची जपणुक केली आहे. गेली पंचवीस वर्षे अमेरिकेतील लाँस ऐन्जिलस या शहरात श्री.विजय पाटील राहतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेकावर आधारित आंतरराष्ट्रीय स्तरावरती २०२३ कार्यक्रम साजरा केला होता. महाराष्ट्र संस्कृती परंपरा आणि शिवरायांचे शौर्य व त्यांची गाथा या कार्यक्रमात सादर केली होती.

या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज ग्रंथाचे प्रकाशन त्यांनी केले आहे. या पुस्तकाची प्रत महाराष्ट्र विधानपरिषद उपसभापती व शिवसेना नेत्या डाँ नीलमताई गोऱ्हे व शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांना दिली. श्री विजय पाटील यांच्या या अनोख्या व गौरवास्पद कार्याचे कौतुक डाँ. नीलमताई गोऱ्हे यांनी केले व मुलींच्या सक्षमीकरणा बाबत ही काम करावे असे सांगितले. यावेळी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी विजय पाटील यांनी छत्रपती शिवरायांच्या या कार्यक्रमासाठी घेतलेल्या परिश्रमाचे अभिनंदन केले.



# भंडाऱ्यातील उर्वरीत धान्य खरेदीसाठी गावकऱ्यांची चढाओढ

## एक मिठाची थैली २३६00 रुपयात तर ५ किलो गहू पिठ ११000 रुपयात खरेदी : मंदिराच्या धान्याच्या सदर हराशीत कैलास पवार आणि गणेश शेळके ठरले कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण

दैनिक आपला विदर्भ

■ गजानन भगत

**नायगांव** : दत्तापुर येथील हनुमान मंदिर हे गावाच ठाण व सर्व जाती-धर्मीयांच धार्मिक स्वरुपातुन सहभाग असलेल मंदिर आहे. या मंदिरात फार पूर्वीपासुन दरवर्षीच आषाढी एकादशीला एक महिना पोथी पारायण परंपरा पुर्वीपान्सून ते आजपर्यंत अविरतपणे सुरू आहे. त्याच ठिकाणी गणेशाची स्थापना व विसर्जनावेळी अमृत योग म्हणून सर्व गावकऱ्यांकडून गहू तांदूळ तूर डाळ आणि वर्गणी जमा करत संपूर्ण गावाचा दहा क्विंटलचा भंडारा येथे करण्यात येतो. त्यात सर्व गावकरी आनंदाने आपला सहभाग घेतात. मंदिराची योग्य बांधणी व विकास करण्यासाठी नवयुवक मंडळी येथे अतोनात प्रयत्न करीत असून त्यात त्यांनी आपले नाव न दर्शविण्याचा मनाचा मोठेपणा दाखवून मनात धार्मिकता व एकात्मता जोपासत पुढाकार घेतला आहे. एकात्मतेच्या स्वरूपात गावकऱ्यांच्या सहकार्यातून मंदिराला विकासाची गती मिळवून अतिशय रहस्यमय मंदिराचे बांधकाम पूर्ण केले जात आहे. आज या ठिकाणी भक्तांना विश्रांती घ्यावीशी वाटेल अशा स्वरूपातील रहस्यमय कामे पूर्ण झाले आहेत. त्या ठिकाणी मंदिराचे पुजारी म्हणून येथील गजानन तुकाराम निकम हे निशुल्क स्वरूपात आपली अखंड सेवा देत आहेत. १७२ वर्षाची जुनी परंपरा आजही जोपासली जात आहे. पारायणाची सांगता टाळ्याच्या गजरात व मृदंगाच्या निनादात अंगणात सडे रांगोळी व फुलांचा वर्षाव करून केली जाते. या ठिकाणी दि. १७ सप्टेंबर रोजी गावकऱ्यांच्या सहभागातून भंडारा पार पडला. तर या भंडार्यात उरलेल्या सर्व धान्याचा लिलाव गावकऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यात मंदिराचे भंडाऱ्यातील राहिलेले धान्य



बाजारभावापेक्षा जास्त पटीने जास्त दरात विकत घेण्यासाठी गावकऱ्याची चढाओढ दिसून आली. त्यात कैलास सुरेश पवार यांनी मिठ थैली २३६00 रुपये, गणेश ज्ञानेश्र्वर शेळके यांनी ५ किलो गहू पीठ ११000 रुपयात, समाधान विक्रम निकम यांनी ५ किलो तूरडाळ ५000 रुपयात, ओम जगन्नाथ शेळके यांनी २० ग्रॅम हळद पुडी ४१00 रुपयात,कडुबा मारोती निकम यांनी ५00 ग्रॅम झाडझुड धान्य ३७00 रुपयात,डॉ. समाधान अशोक निकम यांनी चहा थ्रमास ४१00 रुपयात,भारत निंबेकर यांनी ५00 ग्रॅम मीठ ३१00 रुपयात, सुधाकर तोताराम शेळके यांनी १0 किलो गहू १७0५ रुपयात, ज्ञानेश्र्वर रतन चिपडे यांनी ५0 किलो गहू २१३0 रुपयात, अजय पुरूषोत्तम चिपडे यांनी ५0 किलो गहू १९८२ रुपयात, गजानन रामभाऊ शेळके यांनी ५0 किलो गहू १५५0 रुपयात आणि सुधाकर शंकर निकम १0 किलो तांदूळे ५१0 रुपये खरेदी केले. अशा प्रकारे एकूण ६२४७७ रुपयांच्या धान्याची हराशी अतिशय आनंदात व शांततेत पार पडली. संपूर्ण धान्य व किराणा वाढीव रकमेने खरेदी करून गावकरी मंडळींनी मंदिराला एक सढळ हाताने आर्थिक मदत करण्याचे काम दरवर्षीप्रमाणे यावर्षीही संपूर्ण गावकर्यांनी मोठ्या आनंदाने केले.

### मराठवाडा आणि विदर्भात विजांच्या कडकडाटासह पडणार पाऊस

**मुंबई/प्रतिनिधी** : मागील अनेक दिवसांपासून दडून बसलेला मान्सून पुन्हा एकदा सक्रिय होण्यास सज्ज झाला आहे. विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये मध्यम पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. तर राज्याच्या काही जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता देखील हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. विभागवार पाहूयात राज्यातील कोणत्या विभागामध्ये पावसाची स्थिती कशी असणार आहे.

मुंबई शहर आणि उपनगरात पुढील २४ तासांमध्ये आकाश अंशतः ढगाळ राहून हलक्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. तर मुंबईतील कमाल तापमान ३२ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २६ अंश सेल्सिअस एवढे असणार आहे. तर पुणे शहरांमध्ये देखील ढगाळ आकाशासह हलक्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. पुण्यातील कमाल तापमान ३२ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २० अंश सेल्सिअस एवढे असणार आहे.




# वेडी वाकडी विधाने करून अडचणीत आणू नका

## अजितदादांनी शिंदे गटाच्या आमदाराचे टोचले कान

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : राग आम्हालाही येतो पण व्यक्त होताना जरा मर्यादा पाळणे आवश्यक असते,असा सल्ला देत वेडी वाकडे विधाने करून आम्हाला अडचणीत आणू नका, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी शिवसेना शिंदे गटाचे नेते आमदार संजय गायकवाड यांचे नाव न घेता कान टोचले. महायुती सरकारची महत्त्वकांक्षी लाडकी बहीण योजनेचा कार्यक्रम बुलढाण्यात संपन्न होतो आहे. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, तसेच महायुतीच्या घटकपक्षांतील सर्व लोकप्रतिनिधी तसेच शासकीय अधिकाऱ्यांची देखील कार्यक्रमाला उपस्थिती आहे. यावेळी पुढे बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आ. संजय गायकवाड यांना खडसावले, काँग्रेसचे नेते तथा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची जीभ कापणाऱ्याला ११ लाखांचे बक्षीस देईन, असे वादग्रस्त वक्तव्य शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी केले. त्यांच्या विधानावर देशभरातून आक्षेप नोंदविण्यात आले. त्यामुळे महायुतीच्या नेत्यांची प्रचंड कोंडी झाली. हाच धागा पकडून अजित पवार म्हणाले, वेडी वाकडे विधाने करून कृपया मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस आणि मला अडचणीत आणू नका. वाचाळवीरांनी बोलताना जरा मर्यादा पाळणे आवश्यक आहे. भाषा वापरताना थोडी काळजी घ्या. राग आम्हालाही येतो पण व्यक्त होताना जरा मर्यादा पाळणे आवश्यक असते, अशा शब्दात अजित पवार यांनी गायकवाड यांना खडसावले.यावेळी मात्र उपस्थितही थोडावेळासाठी अचंबीत झाले. लाडकी बहीण योजना सुरू राहावी असे वाटत असेल तर महायुतीला मतदान करा, लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून आम्ही आमच्या




भगिनींना आर्थिक संपन्न करत आहोत. त्यांच्या सबलीकरणाचा प्रयत्न शासनाच्या माध्यमातून सुरू आहे.

मात्र ही योजना बंद करण्याचे षडयंत्र विरोधक रचत आहेत. म्हणूनच लाडकी बहीण योजना सुरू राहावी, असे वाटत असेल तर महायुतीला मतदान करा, असे आवाहन अजित पवार यांनी केले. त्याचवेळी विरोधकांच्या भुलथापांना बळी पडू नका, लाडकी बहीण योजना सुरूच राहील, असेही अजित पवार यांनी उपस्थितांना आश्वस्त केले. तर,अजित पवार यांची राहुल गांधींवर टीका करताना राहुल गांधी यांची आरक्षण काढण्याची भाषा चुकीची आहे. लोकसभा निवडणुकीत त्यांनीच फेक नरेटिव्ह पसरविले. मोदींजींच्या नेतृत्वाखालीचे सरकार निवडून आले तर आरक्षण काढून घेतले जाईल, असा प्रचार त्यांनीच केला. मात्र आता त्यांच्याच तोंडात आरक्षण काढून घेण्याची भाषा आहे, अशी टीका अजित पवार यांनी केली.

---

## विविध वृत्त...

### नंदुरबारात दोन गटात वाद, मोठ्या प्रमाणात नुकसान, शांततेचे पोलीस अधीक्षकाचे आवाहन



दैनिक आपला विदर्भ

**नंदूरबार/प्रतिनिधी** : पैगंबर जयंती निमित्त आज नंदुरबार शहरात मिरवणूक काढण्यात आली होती. या दरम्यान दोन गटात वाद निर्माण झाल्याने शहरात तणाव निर्माण झाला.काही भागात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून मोटरसायकलींची नासधूस करण्यात आली आहे. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे तणाव मिटला .आता नंदुरबार शहरात तणावपूर्ण शांतता असून मोठ्या संवेदनशील भागात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्तान तैनात करण्यात आला आहे. नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्र्वास ठेवू नये व सोशल मीडियाच्या माध्यमातून कोणीही अफवा पसरवु नये अफवा पसरवण्यावर कडक कारवाई करण्याचे निर्देश जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस यांनी दिले आहे..

### वसंतराव नाईक विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार** : लोणार येथे शालेय अंडर नाईन्टीन तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्यामध्ये झालेल्या शालेय क्रिकेट स्पर्धेमध्ये बीबी येथील वसंतराव नाईक कनिष्ठ महाविद्यालयातील क्रिकेट संघाने भरघोस विजय मिळवून जिल्हास्तरावर निवड झाल्याचा बहुमान मिळविला आहे.


लोणार येथे १८ सप्टेंबर रोजी घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय शालेय अंडर नाईन्टीन क्रिकेट स्पर्धेत क्रिकेट या खेळामध्ये बीबी येथील वसंतराव नाईक कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये अजिंक्य आटोळे, गणेश खंडागळे ,रोहन आंधळे, तुषार मुर्तडकर, कृष्णा महाजन, आदित्य सरकटे ,रवी भोकरे, सुमित मोरे ,विवेक खार्डे ,ओम राठोड, शुभम राठोड, संकेत बनकर ,धीरज चव्हाण, धीरज फड ,अमित तांदुळे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी बजावून घवघवीत यश मिळविले व जिल्हास्तरीय स्पर्धा खेळण्यासाठी निवड झाल्याबद्दल वसंतराव नाईक महाविद्यालयाचे अध्यक्ष अभय चव्हाण, प्राचार्य आर बी राठोड, क्रीडा शिक्षक एस आर राठोड, व शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेत यश मिळविण्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी या स्पर्धेचे नेतृत्व अरुण खरात, मस्के सर ,मिसाळ सर, यांनी केले.

### रिसोड येथे राष्ट्रमाता जिजाऊ चौकात जिजाऊ चे स्मारक करा: अमोल नरवाडे




दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी** : ज्या मातेने एक नव्हे तर दोन दोन छत्रपती दिले अशा राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या रिसोड येथील वाशिम नाका परिसरामध्ये जिजाऊ चौकात भव्य दिव्य स्वरूपात स्मारक व्हावे याकरिता अमोल भाऊ मित्र मंडळ यांनी विधान परिषद आमदार भावनाताई गवळी यांना निवेदन देऊन यासंदर्भात मागणी केली आहे.



या संदर्भात आमदार भावनाताई गवळी यांनी निवेदनावर सकारात्मक पाऊल उचलून लवकरात लवकर राष्ट्रमाता जिजाऊ यांचा भव्यदिव्य स्वरूपात मोठे स्मारक कसे होईल यासाठी शंभर टक्के प्रयत्न करणार असल्याचे भावनाताई गवळी यांनी उपस्थित अमोल भाऊ मित्र मंडळ यांना सांगितले. प्रसंगी अमोल नरवाडे,अशोकराव नरवाडे मा.सरपंच, राजू पाटील बोडखे, विश्र्वासराव नरवाडे, शंकरराव नरवाडे, सिद्धेश्र्वर नरवाडे, विनोद नरवाडे माजी उपसभापती,अंकुश खरात,विष्णु कोळपे,लोणी येथील सरपंच राजू चौगुले,संदीप पाटील नरवाडे, गजाननराव नरवाडे यांच्यासह शेकडो जिजाऊ भक्त उपस्थित होते.

---

### डिझेल ओतून करणार मंत्रालयात शासनाचा निषेध
### शेत मालाला योग्य भाव देण्याची मागणीकडे दुर्लक्ष

दैनिक आपला विदर्भ

■ नासीर शेख



*__पातूर__ : शेत मालाला योग्य भाव देण्याची मागणीकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने २८ सप्टेंबर रोजी वीर भगतसिंग जयंतीच्या दिवशी मंत्रालयात डिझेल ओतून शासनाचा निषेध करण्याचा इशारा वीर भगतसिंग चळवळीचे संस्थापक रवींद्र अनिरुद्ध महानकार यांनी १८ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे. दहा वर्षांपूर्वी सोयाबीन, कापसाला जे भाव होते, तेच भाव २०२४ वर्षी सुद्धा आहे. मात्र खत बियाणे तणनाशक यांचे भाव तिप्पट वाढले आहे. सोयाबीनला सहा हजार, कापसाला दहा हजार रुपये प्रति क्विंटल प्रमाणे भाव देण्यासाठी प्रशासनाला वारंवार निवेदन दिले, मात्र शासनाकडून अद्यापही दखल घेतली गेली नाही,त्यामुळे दहा वर्षापूर्वीच्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या खताच्या कीटनाशक तणनाशक याच्या पावत्या व तहसीलदारांना दिलेल्या तक्रारीच्या प्रती मंत्रालयाच्या आवारात फेकून २८ सप्टेंबर रोजी अंगावर डिझेल ओतून शासनाचा निषेध करण्याचा इशारा वीर भगतसिंग चळवळीचे संस्थापक रवींद्र अनिरुद्ध महानकार यांनी दिला आहे.*

---

### शिवाजी विद्यालय भर जहागीर येथे जिल्हास्तरीय मूल्यांकन संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी** : मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा योजनेअंतर्गत शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय भर या शाळेने तालुक्यांमध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी करत दुसऱ्या वर्षी सुद्धा आपला तालुकास्तरीय शैक्षणिक क्षेत्रातील दबदबा कायम ठेवला. माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-२ शासनाच्या या महत्त्वाकांक्षी व दूरदृष्टीने राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांमध्ये सहभाग नोंदवून भर जहागीर रिसोड तालुक्यातून सर्वोत्कृष्ट कामगिरी पार पाडली.

यामुळे तालुकास्तरीय मूल्यमापनाच्या नंतर लगेचच शिक्षण विभाग जिल्हा परिषद वाशिम च्या वतीने शिक्षण अधिकारी राजेंद्रजी शिंदे व त्यांच्या चमूने भर जहागीर विद्यालयांमध्ये




येऊन जिल्हास्तरीय मूल्यांकन केले. यावेळी जिल्हास्तरीय चमूचे एम.सी.सी. ग्रुपने व विद्यार्थी वर्गाने अभूतपूर्व असे स्वागत केले. शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये जिल्हास्तरीय मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा -२ या योजनेअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या सर्व उपक्रमांची चमुने प्रत्यक्ष पाहणी केली. कार्यालयीन दस्तऐवजाची छाननी केली.

मूल्यांकन चमुने प्रत्यक्ष कार्यालय,वर्गामध्ये जाऊन वर्गखोल्या, फर्निचर, शैक्षणिक क्षमता चाचणी, अध्ययन निष्पत्ती, उपस्थिती, भाषण क्षमता,वाचन क्षमता, लेखन क्षमता, गणितीय क्रिया आनंददायी शनिवार उपक्रम, भौतिक सुविधांची पूर्तता शासनाद्वारे राबविल्या जाणाऱ्या विविध शिष्यवृत्ती व सवलतींची लाभार्थ्यापर्यंत पोहोचण्याकरता केलेले कार्य, मतदान प्रचार व प्रसार साक्षरता अभियानातील सहभाग, महावाचन उत्सव २०२४ मधील सहभाग या सर्व बाबींची मूल्यांकन चमूने काळजीपूर्वक व काटेकोरपणे तपासणी केली.

भौतिक दृष्ट्या सुसंपन्न असणाऱ्या व शैक्षणिक दृष्ट्या प्रगत असणाऱ्या या विद्यालयाचा प्रगतीचा आलेख नेहमीच चढता राहिलेला आहे. प्राचार्य बी.जी. काळे यांच्या मार्गदर्शनात विद्यालयातील सर्व कर्मचारी विद्यालयाच्या प्रगतीसाठी नेहमीच कटिबद्ध असतात.

---

# गणेश विसर्जनात जपला अध्यात्मिक ठेवा

## छत्रपती शिवाजी महाराज फाउंडेशन आरेगावचा स्तुत्य उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी** : छत्रपती शिवाजी महाराज फाउंडेशन व्दारा संचालीत शिवनेरी प्रतिष्ठान गणेश मंडळ, शिवतेज गणेश मंडळ आणि एकता गणेश मंडळ आरेगाव यांच्या वतीने दरवर्षी श्रींची प्रतिष्ठापना करण्यात येते. यावर्षी सुध्दा मोठ्या उत्साहात प्रतिष्ठापना करून यांनी विविध सामाजिक उपक्रम या तिन्ही मंडळाच्या वतीने गणेश विसर्जन मिरवणुकीत अध्यात्मिक ठेवा जोपासला आहे.

या स्तुत्य उपक्रमाबद्दल या गणेश मंडळाचे सर्वत्र कौतुक होत आहे. महाराष्ट्राची अध्यात्मिक संस्कृती टाळ, मृदुंग,पखवाज आता कालबाह्य होत असून महाराष्ट्रातून विविध ठिकाणांहून निघणाऱ्या



दिंड्यांमध्ये ह्या आत्मिक समाधन देणाऱ्या वस्तू बघायला मिळतात. दिंड्या महानगरे पार करत विठ्ठल ओढीने निघतात. ग्रामीण भागाला दिंड्यांच्या पावलांचा रस्त्यांमुळे स्पर्श होणे तसा दुर्मिळच असतो. अशा

### महाराष्ट्राची संस्कृती जोपासण्यासाठी एक पाऊल

सर्वांचे लाकडे असलेल्या बाप्पाची स्थापना म्हटले की डीजे,रोषणाई आणि थिरकणारी तरुणाई असे चित्र आपल्या डोळ्यांसमोर उभे राहते.परंतु, मेहकर तालुक्यातील आरेगाव येथील तरुणाई आणि ग्रामस्थांनी विविध विचित्र पध्दतींना फाटा देत ग्रामीण संस्कृतीला महाराष्ट्रभर पुन्हा नव्याने ओळख मिळेल,अशा पध्दतीत श्री गणेशांना निरोप दिला.महाराष्ट्राला लाभलेला संताचा, महाराष्ट्राच्या संस्कृतीचा वारसा जोपासण्याचे एक पाऊल टाकत इतर गणेश मंडळासोबत एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

संस्कृतीचे दर्शन नव्या पिढीला व्हावे त्यांनी आपली संस्कृती काळजात जपावी, गणेशोत्सवाला आपल्या संस्कृतीला बाधा पोहचवणार्या विविध कार्यक्रमाला फाटा बसावा, महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जतन व्हावे, युवकांवर वाईट परिणाम होऊ नये, तसेच अनेक अनुचित घडनांनाही आळा बसावा, आपली संस्कृती टिकावी, युवकांवर योग्य संस्कार व्हावे, या हेतूने आरेगाव ता. मेहकर येथील छत्रपती शिवाजी महाराज फाउंडेशन व्दारा संचालीत शिवनेरी प्रतिष्ठान गणेश मंडळ, शिवतेज गणेश मंडळ आणि एकता गणेश मंडळ यांनी यावर्षी विसर्जनाच्या दिवशी अध्यात्मिक वातावरणात श्री गणेश विसर्जन मिरवणूक काढून इतरांना आदर्श देण्याचा पायंडा पाडला. या मिरवणुकीत अभंगाचे गायन, स्तोत्रांचे पारायण, गण, गवळणीचा नमुना आणि ज्येष्ठांपासून तरुणाई ते बालक, महिला यांनी पावली खेळत बाप्पांना निरोप दिला.या धार्मिक कार्यक्रमात तरुणाई, बालक व महिला भाविकांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त सहभाग घेतला. या संस्कृती जपण्याच्या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे आरेगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज फाउंडेशन व्दारा संचालीत शिवनेरी प्रतिष्ठान गणेश मंडळ, शिवतेज गणेश मंडळ आणि एकता गणेश मंडळ यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.तसेच या आध्यात्मिक उपक्रमामुळे पोलिस प्रशासनावरीलही बंदोबस्ताचा तान कमी होण्यास मदत झाली आहे. तर लहान युवकांना आपल्या संस्कृतीचे दर्शन घडले आहे.

---

### प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचे आज ऑनलाईन उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** : यावसायिक शिक्षणातून कौशल्य विकास या संकल्पनेचा फायदा अधिकाधिक युवक-युवतींना होण्यासाठी जिल्ह्यातील १३ तालुक्यांतील एकूण ६३ महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रे सुरु करण्यात येत आहेत. जिल्ह्यातील या ६३ महाविद्यालयांध्ये शुक्रवार दि. २० सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १२.३० वाजता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे या केंद्रांचे उद्घाटन होणार आहे. या कार्यक्रमास ग्रामीण व शहरी भागातील युवक-युवतींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. तसेच या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी केले आहे.

---

# प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ३ नल जल मित्रांची होणार नियुक्ती

## इच्छुकांनी तात्काळ ग्रामपंचायतशी संपर्क साधावा - गुलाबराव खरात मुकाअ जि. प. बुलढाणा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : जल जीवन मिशन अंतर्गत राज्यातील पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती होणे अत्यंत आवश्यक असल्याने जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये गवंडी / प्लंबर , मेकॅनिक / फिटर व इलेक्ट्रिशियन / पंप ऑपरेटर याप्रमाणे तीन नल जल मित्र यांची नेमणूक करण्यात येणार आहे. यासाठी इच्छुकांनी दि. २६ सप्टेंबर पर्यंत आपापल्या ग्रामपंचायतशी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी केले आहे.

याबाबत जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेची देखभाल दुरुस्ती योग्य रीतीने व्हावी. या उद्देशाने प्रति ग्रामपंचायत ३ नलजलमित्र यांची निवड करण्यात येणार आहे. वरील तिन्ही पदांसाठी प्रत्येक पदासाठी तीन याप्रमाणे प्रति ग्राम पंचायत ९ उमेदवारांची नामनिर्देशने राज्यस्तरावर करण्यासाठी ग्रामपंचायतने घेऊन त्यांची माहिती पवर भरायची आहे. ग्रामपंचायतीने सादर केलेल्या नामनिर्देशनामधून राज्यस्तरावरून उमेदवारांची निवड करून त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठी निश्र्चित करण्यात आलेल्या कौशल्य संच पुढीलप्रमाणे आहेत. १.प्लंबर /गवंडी ,२.मोटर मेकनिक / फिटर, व ३.इलेक्ट्रिशियन / पंप ऑपरेटर या तीन ट्रेडसाठी गावातील अनुभव असलेल्या व उचित पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येणार आहे. म्हणजेच हे कौशल्य असलेल्या उमेदवारास गावातच रोजगार उपलब्ध होणार आहे. म्हणून ग्रामसेवक यांनी २६ सप्टेंबर पर्यंत उमेदवारांचे अर्ज प्राप्त करून घेऊन गुणवत्ता यादीनुसार अनुक्रमे विहित नमुन्यातील पत्राद्वारे तयार करून त्याचे आयडेंटी साईज फोटो,आधार कार्ड आणि शैक्षणिक पात्रतेचे कागदपत्र संबंधित पंचायत समिती येथे सादर करावयाची आहे. त्यानंतर त्यांची प्रि- स्क्रिनिंग टेस्ट राज्यस्तरावरून करण्यात येणार आहे. यामधून प्रति ग्रामपंचायत कौशल्य संचसाठी एक ट्रेडसाठी एक उमेदवार प्रमाणे अंतिम ९ पैकी ३ उमेदवार निवड करण्यात येणार आहेत. तरी इच्छुक उमेदवारांनी आपल्या ग्रामपंचायतीशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा परिषद बुलढाणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी केले आहे.

पाणीपुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती व शाश्र्वततेसाठी ग्रामपंचायत स्तरावर तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याकरिता पात्र उमेदवारांनी ग्रामपंचायत सोबत संपर्क साधावा.

**- गुलाबराव खरात**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**



जल जीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात ग्रामीण भागातील सर्व कुटुंबांना कार्यान्वित घरगुती नळ जोडणीद्वारे प्रती माणसी प्रती दिन ५५ लीटर विहित गुणवत्तेसह व दैनंदिन स्वरुपात कार्यान्वित नळाद्वारे उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. सदर योजनेंतर्गत पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती करण्यासाठी व योजना शाश्र्वत टिकविण्याच्या अनुषंगाने ग्रामपंचायत स्तरावर तांत्रिक मनुष्यबळाची उपलब्धता असणे आवश्यक आहे.यासाठी लोकसहभागाला अनन्यसाधारण महत्व देण्यात आलेले आहे. पाणी पुरवठा योजनेच्या पूर्व नियोजन टप्प्यापासून ते देखभाल दुरुस्ती टप्प्यापर्यंत योजनेच्या भागधारकांचा सक्रीय सहभाग असल्याशिवाय योजना टिकू शकत नाही.